मोहनतारा – संहितासमीक्षा – संपादक

परीक्षणाच्या सुरुवातीलाच श्री. कानिटकर यांनी आपल्या नाटकाला प्रस्तावना जोडून स्वत:ला बांधून घेतलेले नाही याकडे संपादकांनी लक्ष वेधले आहे. हा उल्लेख मुद्दाम करावा असे वाटले असावे ते श्री. कोल्हटकर यांच्यामुळे. श्री. कोल्हटकर आपल्या नाटकांना प्रस्तावना लिहून नाटकाचा हेतू व्यक्त करीत असत त्या कसोटीवर त्यांच्या नाटकांची परीक्षणे करणाऱ्यांना टीका करण्याखेरीज पर्याय राहत नसे त्यामुळे नाटककाराने फक्त नाटक लिहावे, त्या लेखनाचा हेतू, अपेक्षित परिणाम इत्यादी विषयी प्रस्तावनेदाखल काही लिहू नये असे श्री. मुजुमदार यांना सुचवावयाचे आहे. त्यामुळे लेखक व वाचक दोघांची सोय होते.

लेखात ‘मोहनतारा’ नाटक हे रूपांतर म्हणण्यापेक्षा भाषांतरच आहे असे घेऊन चालण्यास हरकत नाही असा निर्वाळा श्री. मुजुमदार यांनी दिला आहे. परंतु याला रूपांतर न म्हणता भाषांतरच का म्हणायचे त्याचा विचार मात्र येथे मांडलेला नाही. त्यामुळे त्याकाळी भाषांतर आणि रूपांतर या दोन संकल्पना तितक्या स्पष्ट नसाव्यात असे म्हणता येते. पाश्चात्य नाटकांना मराठी रूप देताना लेखकांकडूनही भाषांतर–रुपांतराच्या बाबतीत सरमिसळ होत होती असे दिसते.

परीक्षणलेखात श्री. मुजुमदार यांना ‘मोहनतारा’ नाटकाच्या भाषेसंबंधीचा विचार मांडावयाचा आहे. म्हणून त्यांनी या एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केले आहे. नाटकाच्या भाषेच्या संदर्भात त्यांनी खालील मुद्द्यांचा विचार केला आहे.

१. हे भाषांतर प्रयोगाच्या दृष्टीने बरोबर झाले आहे किंवा नाही ? म्हणजे यातील भाषा पात्राच्या तोंडात घालण्यासारखी आहे की नाही
२. गद्य नाटकात एकंदर भाषेची ठेवण कशी असावी भाषा प्रसंगानुरूप असावी की पात्रानुरूप असावी ?

आपल्या परीक्षणलेखाची चौकट स्पष्ट करून नंतर लेखकाने भवभूतीचे मालतीमाधव व मोहनतारा किंवा Rome and Juliet यांच्यातील साम्य दाखविले आहे. - ते असे -

१. रोमिओ व ज्युलिएट यांचे प्रेम सफल होण्याला दोन घराण्यातील वैर आड येत होते.
मालती व माधव यांच्या प्रेमाआड मालतीचा बाप येत होता.
२. रोमिओ आणि ज्युलिएट मध्ये त्या दोघांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी फ्रायरची योजना केली आहे. ‘ माालतीमाधव मध्ये कामंदकी ह्या जोगिणीकडे ते काम आहे.
३. ज्युलिएटच्या बापाला तिचे लग्न पारिस या सरदाराशी लावून द्यायचे होते. मालतीला प्राप्त करून घ्यायची खटपट नंदन नावाचा सरदार करीत होता.

या दोन्ही नाटकात हे साम्य असले तरी आपल्या मनोभावना व्यक्त करण्याची त्यातील नायक-नायिकांची रीत मात्र परस्परभिन्न आहे. हा फरक, पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीतला फरक आहे. हे स्पष्ट करण्यासाठी Hindu Theatre मधील उतारा लेखकाने दिला आहे.४

‘The passion of Malati is equally intense with that of Juliet, but her unconquerable reserve even to the extent of denying her utterances to him she loves more than life is a curious picture of the restraint to which the manners of Hindu Women were subjected even while they were in enjoyment as appears from the drama of considerable personal freedom.Ÿ'

एका देशातील चालीरीतींचे नाटक दुसऱ्या देशातील चालीरीतींशी तंतोतंत जुळवून दाखविता येत नाही भारतीय प्रेक्षकवर्गाला शेक्सपीअरच्या नाटकांची भाषांतरे पाहण्याची सवय लागून गेलेली आहे त्यामुळे पात्रांचे स्वभाव व मनोधर्माचे भेदाभेद, देशपरत्वे चालीरीतींचा परकीयपणा, स्थळकाळाचे ऐक्य या गोष्टी आमच्या प्रेक्षकांच्या एकदम लक्षात येत नाहीत. श्री. मुजुमदार यांना भीती वाटते आहे ती ही की, आत्ता या साऱ्या गोष्टी त्यातील नावीन्यामुळे मनोरंजक वाटत असतील पण एकदा त्यांच्याशी दाट परिचय झाला की, भारतीय नाटकपद्धतीचा मागमूससुद्धा राहणार नाही. लेखकाला वाटत असलेली ही भीती

लक्षात घेण्याजोगी आहे. कारण या भावनेचा संबंध प्रेक्षकांच्या आभिरुचीशी आहे. अभिरुची ही संस्कृतीशी निगडित असते आणि नाटक हा कलाविष्कार संस्कृतीचा मानदंड मानला जातो. पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींची वरवरची, विशेष अर्थवत्ता नसलेली सरमिसळ, संमिश्रता ही, मराठी अभिरुची शबल करणारी, किंबहुना तिला भारतीय संस्कृतीपासून दूर नेणारी ठरेल. हा श्री. मुजुमदार यांचा विचार अत्यंत मोलाचा आहे. परकीय नाट्यकृती येथील संस्कृतीशी एकरूप होऊनच अवतरल्या पाहिजेत. नुसती पात्रे, स्थळे यांची नावे बदलून चालणार नाही तर आपल्या आचारविचारांचे चित्र उसनवार घेतलेल्या नाटकातून दाखविता आले पाहिजे असे ते म्हणतात ‘ चारविचारांचे चित्र याचाच अर्थ आपल्या संस्कृतीचे दर्शन, आपल्या मनाची स्पंदने पाश्चात्य कलाकृती मराठीत आणताना तसे घडत नव्हते म्हणूनच श्री. मुजुमदार म्हणतात, ‘ राठी भाषेत झालेली यच्चयावत् भाषांतरे किंवा रूपांतरे भेसळीची नाटके आहेत. हा शेरा नीट ध्यानात घेण्याजोगा आहे. ‘ हनतारा नाटक या दोषापासून सुटले नाही असे सांगून त्यांनी, स्वतंत्र कृती बनविण्याला जितकी कल्पनाशक्ती लागते तिच्याहून अधिक दुसऱ्याची कृती आपलीच म्हणून बेमालूम बनवून दाखविण्यात लागते असे आपले मत त्यांनी दिले आहे. आमचे नाटककार अल्पशा परिश्रमात थोडीशी डागडुजी करून वेळ भागवून नेतात त्यामुळे त्यांच्या कृतीत रमणीयपणा दिसून येत नाही असा ठपकाही त्यांनी अत्यंत स्पष्टवक्तेपणाने आपल्या नाटककारांवर ठेवला आहे. त्यानंतर त्यांनी ‘ हनतारा नाटकातील स्त्री-पुरुषांच्या तोंडी घातलेली भाषा कशी सदोष आहे ते सोदाहरण दाखविले आहे. मुळातील इंग्रजीचे भाषांतरही काही ठिकाणी कसे ग्राम्य झाले आहे तेही दाखविले आहे. उदाहरणार्थ :

See, how she leans her cheek upon her hand
O, that I were a glove upon that hand
that I might touch that cheek

याचे भाषांतर -सुंदरी तुझ्या हातातील घागर जर मी झालो असतो तर तुझ्या हातात झेलला गेला असतो

हे वाक्य आणि त्यातील कल्पना अत्यंत वाईट आहे. तसेच -

Romeo - Alack ! there lies more peril in thine eye, than twenty of their swords ; look thou but sweet and I am proof against their enimity - याचे भाषांतर - ‘ मोहन - प्यारी काय सांगू तुझ्या दृष्टीची धार त्यांच्या हजार तरवारींहूनही जबर

आहे. ती धार मजवर प्रेम वर्षेल तर त्या दृष्टीने हा देह वज्र होईल. मग त्यावर वैऱ्यांचा मार काय करील फार तर गुदगुल्या करील.

हे अतिशय अवघड आहे. ' मोहनतारा मधील भाषेवर, ही टीका करताना ''आ मचे ते ' नाट्यकलारूक्‌कुठार वाले कुठे गेले ' असाही एक टोला जाता जाता मारलेला आहे.

मोहनतारा हे भाषांतर करताना मुळातील नाटकात केलेल्या बदलांचा विचारही श्री. मुजुमदार यांनी केला आहे. -

१. मुळातील रोझालिन्‌ 'मो हनतारा त दाखविलेली नाही. यात कमळा हे पात्र घातले आहे व तिचे लग्न प्रतापरावाशी (Tybalt) लावले आहे. कमळेवर मोहनचे (Romeo) मन गेले होते पण तिचे लग्न झाल्यामुळे मोहनची निराशा झाल्याचे दाखविले आहे. असा बदल करून मोहनची भूमिका नाटककर्त्याने सावरून धरली आहे.

२. ज्युलिएटच्या बापाच्या घरच्या मेजवानीच्या प्रसंगाऐवजी महालक्ष्मीच्या घागरी फुंकण्याचा प्रसंग घातला आहे तो पूर्णपणे अयोग्य आहे. ज्या घराण्याशी आपले पिढ्यानुपिढ्या वैर आहे त्या घरात केवळ मित्राच्या आग्रहाने एखादा तरुण जाईल ही गोष्ट मनुष्य स्वभावाला धरून नाही. ज्युलिएटवर (तारा) अगोदरपासून प्रेम होते असेही नाही. मूळ नाटकात रोमिओ व त्याचे मित्र असे राजरोसपणे न जाता तोंडावर मुखवटे (चरीज्ञ) घालून गेलेले आहेत. आमंत्रण नसताना वैऱ्याच्या घरात शिरताना मोहनच्या किंवा त्याच्या मित्राच्या मनात कसलीही कुशंका आल्याचे नाटककाराने दाखविलेले नाही.

भाषांतर करताना झालेल्या आणखीही काही चुका येथे दाखविलेल्या आहेत. घागरी फुंकण्याला 'ना चणे असा शब्द वापरला आहे. तो चूक आहे. या समारंभाला मोहन उघडपणे आलेला आहे. मुखवटा घालून नाही. तरीही प्रतापरावाने त्याला आवाजावरून ओळखल्याचे दाखविले आहे. इंग्रजीचे भाषांतर करताना पूर्वापार संबंध राखला गेला नाही याचे हे उदाहरण आहे.

विवेचनानंतर तब्बल आठ महिन्यांनी म्हणजे रंगभूमी वर्ष २रे, मार्च-एप्रिल-मे १९०९, अंक ८/९/१० मध्ये पृ.९ ते २४वर 'मोहनतारा' चे पुढील विवेचन सुरू करून ते पूर्ण केले आहे.

कालिदास भवभूतीलासुद्धा नाटकात चुंबन दाखविण्याची लाज वाटली पण मूळ नाटकातील हा प्रकार 'मोहनतारा' त बिनदिक्कत घडवून आणला आहे. यावर Fools rush in where angels fear to tread असे म्हणून श्री. मुजुमदार यांनी कडक टीका केली आहे. काही असंबद्ध संवादांची उदाहरणे दिली आहेत. ''जुन्या सूत्रधारी नाटका' च्या नकला अत्यंत पांचट आहेत असे सांगून श्री. मुजुमदार म्हणतात - ' प्रवेश स्वत: श्री. छापखाने यांनी लिहिला नसून कोणीतरी लहान मुलांकडून त्यांनी लिहविला असावा असे वाटते. सांगलीसच प्रथम सूत्रधारी नाटकाची उत्पत्ती झाली व ती पाहून पूर्वी लहान मुले त्या नाटकाच्या नकला तेथे वाळवंटात करीत असत. तीच प्रवृत्ती अद्याप, ती - नाटके बुडाली तरी - छापखाने यांच्या ठिकाणी जागृत आहे. हा आनुवंशिक संस्कार म्हणावयाचा'

श्री. मुजुमदार यांची ही कठोर टीका, त्यांची निर्भीड वृत्ती व स्पष्टवक्तेपणा दर्शविणारी आहे. त्याकाळातील एका मान्यवर विद्वानांच्या पदरात त्यांच्या चुकांचे माप घालण्यास संपादक कचरलेले नाहीत. ही टीका केवळ नाट्यप्रेमातून केलेली असल्यामुळे तिचे महत्त्व विशेष वाटते. आज हा स्पष्टवक्तेपणा प्रथितयश, नामवंत साहित्यिकांच्या बाबतीत तरी क्वचितच कोणी दाखवतो.

अंक २, प्रवेश २ मधील बाल्कनीचा प्रवेश हा अतिशय महत्त्वाचा प्रवेश आहे. मराठीत याचे भाषांतर याहीपेक्षा गोड भाषेत करता आले असते तरी श्री. छापखाने यांचे भाषांतर चित्तवेधक आहे असे सांगून तो प्रवेश उदाहरणादाखल दिला आहे. वास्तविक परीक्षणलेखात मुळातील आठपानी प्रवेश छापण्याची काही आवश्यकता नव्हती. त्यावरची टीकाटिप्पणी पुरेशी होती. या प्रवेशात रोमिओ (मोहन) भिंतीवरून उडी मारून कसा आला हे प्रेक्षकांना प्रत्यक्ष दिसले पाहिजे असे मूळ नाटकावरूनही कळते पण शेक्सपीअरने आणि भाषांतरकर्त्याने ही गोष्ट संदिग्ध ठेवली आहे असे सोदाहरण दाखवून दिले आहे.

भाषेच्या अनेक चुका दाखवून शिवाय इतर ही खटकलेल्या काही गोष्टींची चर्चा श्री. मुजुमदार यांनी केली आहे. उदा. कमळा या पात्राला पुरुषवेष देणे. ते म्हणतात, 'त्येक

दहा-पांच नवीन नाटकात एक बाई पुरुषवेषाने बाहेर पडलेली दिसते. ही शेक्सपीअरपासून बेतलेली उष्टी युक्ती किती दिवस आता चालवायची ५ मराठी नाटकात पुढे बराच काळपर्यंत हा वेषांतराचा प्रकार चालू राहिलेला दिसतो.

नीरस भाषा, अस्वाभाविक प्रवेशरचना यामुळे श्री. कानिटकर यांची ' ती चांगली तर झाली नाहीच, परंतु मूळ कृती छिन्नविछिन्न केल्यासारखीच झाली.

अभिप्रायावरून, मूळ कलाकृतीचाही आनंद नाही आणि नवीन कलाकृती निर्माण केल्याचाही आनंद नाही अशी विचित्र अवस्था या नाटकाबाबत झालेली दिसते. शेक्सपीअरची सर्व, भाषांतर झालेली नाटके एके ठिकाणी करावी. त्यात एकही निर्दोष असे आढळणार नाही६ हा श्री. मुजुमदार यांचा अभिप्राय मार्मिक आहे. रोमान्स हा, शेक्सपीअरच्या रोमिओ अँड ज्यूलिएट या नाटकाचा प्राण आहे. दोन प्रेमीजीवांच्या मृत्यूनंतर दोन घराण्यातील वैर संपुष्टात आले आहे. मूळ नाटकातील रोमान्सचा हा कळसच छापखाने यांनी काढून टाकला आहे.

अशारीतीने मूळ नाटकाचे मर्म उमगणे, प्रवेशरचना, भाषेचा वापर अशा अनेक बाबतीत ' हनतारा असमाधानकारक आहे असा अभिप्राय श्री. मुजुमदार यांनी दिला आहे.

ना टकाची विवेचनपद्धती या प्रकारची असावी असे त्यांना वाटत असल्याचे लेखाच्या शेवटी त्यांनी सांगितले आहे. ' स्तक परीक्षण कसे असावे याबद्दलची त्यांची कल्पना त्यांनी या परीक्षणाद्वारे मांडली आहे. ते म्हणतात, या प्रकारची नाटकाची विवेचन पद्धती असावी असे आम्हास वाटते. ' पुस्तक परीक्षण या नावाखाली ग्रंथकर्त्याची नुसती टवाळकी करण्याची प्रवृत्ती जी इतरत्र दृष्टीस पडते ती आम्हांस निंद्य वाटते. त्या योगाने ग्रंथातील गुणांकडे निर्दोष मनाने पाहण्याची प्रवृत्ती होत नाही. '७

परीक्षणलेखात टवाळकी नसावी. लेखकाचे गुण पाहावेत. अभ्यासपूर्ण मुद्देसूद विवेचन असावे. असा, श्री. मुजुमदार यांचा याबाबतचा विचार आहे आणि तो योग्य आहे हे स्पष्ट आहे.